# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः30.04.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या,**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी घेतली संरक्षण विषयक महत्त्वपूर्ण बैठक

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झालेल्या राज्यातल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी 50 लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा मंत्रीमंडळाचा निर्णय

उर्जासंपन्न महाराष्ट्रासाठी राज्य शासनानं उदंचन जलविद्युत प्रकल्पांवर लक्ष केंद्रित केल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन

आणि

महिलांच्या मर्यादित षटकांच्या तिरंगी क्रिकेट मालिकेत भारताचा दक्षिण अफ्रिकेवर 15 धावांनी विजय

**पंतप्रधान**

पेहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल संध्याकाळी नवी दिल्लीतल्या त्यांच्या निवासस्थानी संरक्षण विषयक उच्चस्तरीय बैठक घेतली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंग, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान आणि तीनही सैन्य दलांचे प्रमुख या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीनंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनीही पंतप्रधानांची भेट घेतली.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत झालेल्या युग्म परिषदेला संबोधित केलं. या पहिल्याच धोरणात्मक परिषदेत प्रशासन, शिक्षण संस्था, उद्योग आणि नवोन्मेष क्षेत्रातले अग्रणी सहभागी झाले होते. 21व्या शतकाच्या आवश्यकतांनुसार देशातल्या शिक्षण व्यवस्थेचं आधुनिकीकरण केलं जात असल्याचं पंतप्रधान म्हणाले. वन नेशन वन सबस्क्रिप्शन मुळे देशातल्या प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत जागतिक दर्जाचं ज्ञान पोहोचत आहे. देशाचं भविष्य युवा पिढीच्या हातात आहे, त्यामुळेच भारताच्या उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीने त्यांना घडवणं महत्त्वाचं

आहे असं सांगून नव्या शिक्षण धोरणामुळे देशात परिवर्तन घडत असल्याचं त्यांनी नमूद केलं. प्रतिभा, प्रवृत्ती आणि तंत्रज्ञान यांच्या माध्यमातून भारताचं भविष्य बदलेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**राज्य मंत्री मंडळ निर्णय**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्यु झालेल्या राज्यातल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी 50 लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय काल राज्य मंत्रीमंडळानं घेतला. ज्यांच्या घरी शिक्षणाचा प्रश्न असेल तर तो सोडवण्याचा, रोजगाराचा प्रश्न असल्यास त्यांच्या पाल्यांना शासकीय नोकरी देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. इलेक्ट्रीक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी यासंदर्भातल्या धोरणाला मंत्रीमंडळानं मंजूरी दिली. या धोरणानुसार प्रवासी वाहतुकीच्या इलेक्ट्रीक वाहनांना अनुदान देण्यात येणार असून काही विशिष्ट प्रकारच्या वाहनांना विशिष्ट मार्गावर पथकर माफी दिली जाणार आहे. जहाज बांधणी, जहाज दुरूस्ती आणि जहाज तोडणीबाबतच्या स्वतंत्र धोरणालाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे. पुणे जिल्ह्यातल्या टेमघर प्रकल्पाच्या उर्वरित कामांसाठी आणि गळती प्रतिबंधक कामाच्या सुधारित खर्चाला या बैठकीत मान्यता देण्यात आली. हडपसर ते यवत राज्य मार्गाचं सहा पदरी बांधकाम आणि या रस्त्यावरील सहा पदरी उन्नत मार्गालाही मंत्रीमंडळानं मंजूरी दिली. सर्वसमावेशक पीक विमा योजनेत बदल करुन, पीक कापणी प्रयोगांवर आधारित सुधारित पीक विमा योजना राबवणं, राज्यात रस्ते आणि पूल आदी पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना गती देण्यासाठी आणि भांडवल उभारणीसाठी 'महा इनविट' स्थापन करणं, प्रधानमंत्री यशस्वी या एकत्रिकृत शिष्यवृत्ती योजनेच्या केंद्राच्या मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करणं, राज्यात ॲप बेस वाहनांसाठी धोरण लागू करणं, असे काही निर्णयदेखील मंत्रीमंडळानं काल घेतले.

**मुख्यमंत्री जलसंपदा**

राज्याला उर्जासंपन्न बनवण्यासाठी राज्य शासनानं उदंचन जलविद्युत प्रकल्पांवर लक्ष केंद्रित केलं आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत काल जलसंपदा विभाग, महाजेनको, महाजेनको रिन्यूएबल एनर्जी लिमिटेड आणि अवादा ॲक्वा बॅटरीज यांच्यात तीन सामंजस्य करार करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. या करारांमुळे राज्य उर्जा निर्मितीत अधिक सक्षम होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, संजय राठोड आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. उदंचन जलविद्युत प्रकल्प हे अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील  वैशिष्ट्यपूर्ण आणि अद्ययावत तंत्रज्ञान आहे. यामुळे शेती, उद्योग आणि व्यावसायिक क्षेत्रासाठीची विजेची वाढती मागणी पूर्ण करण्याबरोबरच शाश्वत आणि हरित उर्जा निर्मिती होणार असल्यानं पर्यावरणाचंही रक्षण होईल असं मुख्यमंत्री म्हणाले.

**वेव्हज एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत होणाऱ्या 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट' अर्थात वेव्हज् कार्यक्रमाच्या तयारीची काल पाहणी केली. यावेळी परिषदेबाबत सादरीकरण करण्यात आलं.

उद्यापासून सुरू होत असलेल्या या कार्यक्रमाचं यजमानपद महाराष्ट्र शासनाला मिळालं ही अभिमानाची बाब असल्याचं शिंदे म्हणाले. आंतरराष्ट्रीय स्टुडिओज, निर्मिती संस्था, टेक कंपन्यांच्या भागीदारीची दारं या परिषदेमुळे खुली होतील असं त्यांनी सांगितलं.

**हरित ऊर्जा**

हरित ऊर्जेला चालना देण्यासाठी राष्ट्रीय साखर महासंघ आणि भारतीय हरित ऊर्जा महासंघानं नुकताच एक सामंजस्य करार केला आहे. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे आणि भारतीय हरित ऊर्जा महासंघाच्या बायो एनर्जी समितीचे अध्यक्ष अतुल मुळे यांनी केंद्रीय रस्ते वाहतुक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत नवी दिल्लीत या करारावर स्वाक्षरी केली. याप्रसंगी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील आणि इतर मान्यवर उपस्थित होते. या कराराविषयी हा वृत्तांत...

**सामंजस्य कराराच्या अटींनुसार राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ हरित ऊर्जेसाठी ऊस आणि त्याच्या उप उत्पादनांचा वापर करण्याबाबत आपले अनुभव, ज्ञान, संशोधन आणि कौशल्याचा वापर करेल तसेच यावरील संशोधन प्रकाशनं आणि अहवाल याचा लाभ धोरण निश्चित करण्यात होईल. भारतीय हरित ऊर्जा महासंघ देशात आणि जागतिक स्तरावर उसावर आधारित हरित ऊर्जेला सक्रियपणे प्रोत्साहन देईल, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या भागीदारीत कार्यशाळा आणि परिसंवाद यांसारखे ज्ञान-सामायिकरण कार्यक्रम आयोजित करेल आणि याचा लाभ धोरण ठरविण्यात आघाडीच्याय उद्योजकांसह भागधारकांना होईल. या दोन्ही संस्थांच्या भागीदारीचा लाभ सरकारी संस्थांना होईल कारण त्यांच्या समोर मांडण्यात आलेल्या या विषयावरील प्रश्नांच्या अनेक बाबी त्यांच्यासमोर येतील. या संस्थांच्या संयुक्त प्रतिनिधित्वाने हरित ऊर्जा संवर्धनासाठी एक व्यासपीठ निर्माण होईल. प्रकल्पाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विशिष्ट सहकारी व्यवस्थांवर प्रत्येक प्रकरणाच्या आधारावर वाटाघाटी केल्या जातील. ही भागीदारी भारताच्या बळकट साखर उद्योगाला, त्याच्या झपाट्यानं वाढणाऱ्या हरित ऊर्जेच्या, राष्ट्राच्या स्वच्छ आणि शाश्वत भविष्यासाठी योगदान देणारं एक महत्त्वाचं पाऊल आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.**

**परशुराम जयंती**

राज्यभरात काल परशुराम जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर इथे ब्राह्मण समाज समन्वय समितीतर्फे भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त फेरी काढण्यात आली. बीड जिल्ह्यातल्या पाटोदा शहराचं ग्रामदैवत असलेल्या भामेश्वर मंदिरात तसंच धाराशिव इथल्या अनंतदास महाराज मंदिरात भगवान परशुराम जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

**महाबीज**

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ अर्थात महाबीजचा 49 वा वर्धापन दिन आणि सुवर्ण महोत्सवी वर्षातल्या पदार्पणाचा कार्यक्रम महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. वृक्षारोपण करुन उल्लेखनीय कार्य केलेल्या शेतकरी, महाबीज विक्रेते, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना यावेळी महाबीज पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

**गांजा टोळी अटक**

थायलंडहून भारतात हवाई मार्गानं हायड्रो गांजा मागवून देशात विक्री करणाऱ्या टोळीला नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं अटक केली आहे. या टोळीतल्या  दहा जणांमध्ये परदेशी टपाल कार्यालयातील कस्टम अधिक्षक, हवाला व्यवहार करणारे दोन जण आणि नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील दोन पोलीस कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे.

**क्रिकेट**

महिलांच्या मर्यादित षटकांच्या तिरंगी क्रिकेट मालिकेत काल भारताच्या संघानं दक्षिण अफ्रिकेच्या संघावर 15 धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय महिला संघानं 50 षटकांत 6 गडी बाद 276 धावा केल्या. प्रतीका रावलनं 78 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल दक्षिण अफ्रिकेचा संघ 261 धावा करू शकला. स्नेह राणा हिनं दक्षिण अफ्रिकेच्या पाच फलंदाजांना बाद केलं.

**क्रिकेट**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल कोलकाता नाईट रायडर्स संघानं दिल्ली कॅपिटल्स संघाचा 14 धावांनी पराभव केला. 205 धावाचं लक्ष्य गाठताना दिल्ली कॅपिटल्स संघाला निर्धारित 20 षटकात 9 गडी बाद 190 धावा करता आल्या.

**पाऊस**

गडचिरोली जिल्ह्यात अहेरी आणि आलापल्ली परिसरात काल मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि वादळासह गारांचा पाऊस पडला. या पावसामुळे अनेक घरांवरचे पत्रे उडाले तसंच काही ठिकाणी झाडं उन्मळून पडल्यामुळे वाहतूकीवर परिणाम झाला. वीज पुरवठाही खंडीत झाला.

**हवामान**

राज्यात आज विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि सोसायट्याच्या वाऱ्यांसह पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. इतरत्र हवामान कोरडं राहील. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरण असेल असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**